## थोडक्यात पण महत्वाचे



### कल्याण तालुका श्रमजीवी संघटनेच्या वतीने जागतिक आदिवासी दिन साजरा

टिटवाळा (स. गांवकरी) : कल्याण तालुक्यातील समस्त आदिवासी बांधवांच्या उपस्थितीमध्ये नुकतच सावरकर नगर मांडा ते महागणपती मंदिर टिटवाळा या अंतरामध्ये रॅली काढून जागतिक आदिवासी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कल्याण तालुका अध्यक्ष वासुदेव वाघे, सचिव सुवर्णा कोट तसेच सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्या माध्यमातून या कार्यक्रमाचे सुंदर आयोजन करण्यात आले होते. यावेळी ठाणे जिल्हा उपाध्यक्ष ईश्वर बनसोडे,कल्याण तालुका अध्यक्ष वासुदेव वाघे, तालुका सचिव सुवर्णा कोट, माजी तालूका अध्यक्ष संतोष दळवी, माजी तालूका सचिव नंदू जाधव, तालुका उपाध्यक्ष लक्ष्मण वाघे ,तालुका उपाध्यक्ष कांचन मुकणे , तालुका महिला प्रमुख रूपाली वाघे, तालुका महिला सचिव अनिता वायडे, ज्येष्ठ कार्यकर्ते संतोष वाघमारे, सक्रिय कार्यकर्ते लहू भोकटे, मंगेश जाधव, सुरेखा मुकुंदा, सविता वाघे, शालू वाघे ,अरुण वाघमारे ,जगन वाघ ,महेंद्र जाधव, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे माजी महापौर बुद्धाराम सरनोबत, नगरसेवक राहुल कोट, नगरसेविका तेजश्री गायकवाड, नगरसेवक बंदेश जाधव अश्फाक मांडेकर आणि अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी काढलेल्या रॅलीमध्ये वेगवेगळ्या प्रकारची पारंपरिक नृत्य, वेशभूषा, विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम, विविध आदिवासी गीते, मान्यवरांची भाषणे आदी कार्यक्रम संपन्न झाले. यावेळी या कार्यक्रमाला भरत दळवी युवा विकास मंच मुरबाड विधानसभा अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते भरत दळवी हेही उपस्थित होते. हा जागतिक आदिवासी दिन यशस्वी करण्यासाठी तालुक्यातील सर्व पदाधिकारी यांनी मेहनत घेतल्याबद्दल तालुक्याच्या वतीने तालुका अध्यक्ष यांनी सर्वांचे जाहीर आभार व्यक्त केले.



### आदिवासी दिनानिमित्त रायगडमधील आदिवासी पाड्यांवर मदतीचा हात

ठाणे, दिवा (स. गांवकरी) : जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून दिव्यातील मराठा वॉरियर्स गडकिल्ले संवर्धक, महाराष्ट्र राज्य तसेच महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यातील आदिवासी पाड्यांमध्ये दोन दिवसीय सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत आदिवासी कुटुंबांना शालेय साहित्य तसेच विविध घरगुती उपयोगाच्या वस्तूंचे वाटप करण्यात आले. दिवा शहरातील संस्थेचे प्रेरणास्थान कै. एकनाथ तुकाराम भगत (बाबा) तसेच अजित भगत यांच्या सहकार्याने आणि संस्थेच्या पदाधिकारी, सभासदांच्या अथक परिश्रमातून हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. आदिवासी समाजातील गरजू कुटुंबांपर्यंत थेट पोहोचून त्यांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून आदिवासी पाड्यांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांच्या कुटुंबांना घरगुती वापराच्या वस्तू देण्यात आल्या. या उपक्रमावेळी संस्थापक तथा अध्यक्ष राहुल द. खैर, योगेश राणे, रोहित जाधव, अभिजीत मांडवकर, नितीन शिगवण, सुमित गावडे, अल्पेश पवार, अक्षय भोसले, कलप्पा, कार्तिक गोसावी आणि सचिन गावडे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व सभासद उपस्थित होते. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकीचा संदेश देत आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला आणि कुटुंबांच्या दैनंदिन गरजांना हातभार लावण्याचा प्रयत्न करण्यात आला.

### सचिनदादा कल्याणशेट्टी यांना जिवे ठार मारण्याचा मोठा कट



सोलापूर (स. गांवकरी) : अक्कलकोट चे आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांना जिवे ठार मारण्याचा मोठा कट आखण्यात आला असून हा कट उघडकीस आला असल्यामुळे सोलापूर जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. अक्कलकोट चे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना गोळी मार" चालकाला पैशाचे आमिष, सीसीटीव्हीमध्ये घटना कैद झाली आहे. अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रकार समोर आला आहे. आमदारांच्या निकटवर्तीय चालकाला हेरून त्याच्यामार्फत आमदारांना जीवे मारण्याचे कथित कारस्थान रचण्याचा प्रयत्न झाल्याची तक्रार सदर बाजार पोलिस ठाण्यात दाखल झाली आहे. या प्रकरणी श्रीशैल हुळ्ळी आणि फुलारी या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे विभागीय अधिवेशन उत्साहात

## 'मराठवाडा भूषण' पुरस्काराने मान्यवरांचा गौरव!

छत्रपती संभाजीनगर : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या मराठवाडा विभागाच्या वतीने विभागीय अधिवेशन, 'मराठवाडा भूषण' पुरस्कार सोहळा आणि परिसंवाद रविवारी (९ ऑगस्ट) छत्रपती संभाजीनगर येथील हॉटेल गेट वे येथे उत्साहात संपन्न झाला. पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी 'मराठवाडा भूषण' पुरस्काराने गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे होते. उद्घाटन पालकमंत्री तथा सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते झाले. यावेळी



विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, आमदार संजय केणेकर, आमदार प्रशांत बंब, आमदार प्रदीप जैस्वाल, आमदार सुहास शिरसाठ, मनसे नेते बाळा नांदगावकर, मनपा आयुक्त अमोल येडगे, जिल्हाधिकारी विनय गौडा, डॉ. प्रताप काळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

दुसऱ्या सत्रात 'लेखणीची क्रांती : संघर्ष, सत्य आणि स्वातंत्र्य' या विषयावर परिसंवाद घेण्यात आला. या सत्राच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी होते. यावेळी प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी, शांतिगिरी महाराज, मराठवाडा विभागाचे अध्यक्ष अनिल सावंत आणि छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष डॉ. छबुराव ताके यांची प्रमुख उपस्थिती होती. पत्रकारितेतील बदलते स्वरूप, पत्रकारांसमोरील आव्हाने, सत्यशोधनाची जबाबदारी, पत्रकारांची सामाजिक भूमिका आणि लोकशाहीमध्ये माध्यमांचे महत्त्व यावर परिसंवादात सविस्तर चर्चा करण्यात आली.



यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, राज्य समन्वयक नितीन शिंदे, प्रदेश प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव, इलेक्ट्रॉनिक माध्यम प्रदेशाध्यक्ष अतुल परदेशी, विदर्भ अध्यक्ष नयन मोंढे, मराठवाडा महिला आघाडी प्रमुख आयेशा शेख, संभाजीनगर जिल्हाध्यक्ष प्रशांत क्षीरसागर, नवी मुंबई जिल्हाध्यक्ष दशरथ चव्हाण, धाराशिव जिल्हाध्यक्ष धनंजय पाटील, जालना जिल्हाध्यक्ष दिगंबर गुजर, मनोहर हिंगणे यांच्यासह मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांचे जिल्हाध्यक्ष, पदाधिकारी व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**कार्यक्रमाचे आयोजन मराठवाडा अध्यक्ष अनिल सावंत, छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष डॉ. छबुराव ताके आणि मुख्य सल्लागार मधुकर अण्णा वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या अधिवेशनामुळे मराठवाड्यातील पत्रकारांना संघटनात्मक बांधणी, पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर चर्चा तसेच पत्रकारितेच्या भविष्यातील वाटचालीसाठी नवी दिशा मिळाल्याचे उपस्थितांनी सांगितले.**






## ज्येष्ठ पत्रकार प्रकाश आरोटे लिखित 'माझी स्मरणगाथा' पुस्तकाचे १६ ऑगस्ट रोजी प्रकाशन

अकोले : (स. गांवकरी)

अकोले तालुक्याच्या ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रवासाचा वेध घेणारे ज्येष्ठ पत्रकार प्रकाश आरोटे लिखित 'माझी स्मरणगाथा' या बहुप्रतीक्षित पुस्तकाचा प्रकाशन सोहळा रविवार, दि. १६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता अकोले महाविद्यालयातील के. बी. दादा सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न होणार आहे.




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे,अकोले विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ.किरण लहामटे यांच्या शुभहस्ते पुस्तकाचे प्रकाशन होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चपराक प्रकाशन, पुणेचे प्रकाशक धनश्याम पाटील विराजमान राहतील. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य पतित पावन संघटनेचे प्रांताध्यक्ष,थोर विचारवंत प्रा.एस. झेड.देशमुख आणि माजी आमदार वैभव पिचड, अभिनव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुकर नवले, युवा नेते अमित भांगरे, अगस्ति एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष सतिश नाईकवाडी, सेवानिवृत्त अपर पोलीस अधीक्षक भाऊसाहेब गायकर आणि शिक्षण तज्ज्ञ , लेखक , ज्येष्ठ पत्रकार संदीप वाकचौरे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. 'माझी स्मरणगाथा' हे पुस्तक अकोले तालुक्याच्या इतिहास, समाजजीवन, संस्कृती आणि परिवर्तनाचा अभ्यासपूर्ण मागोवा घेणारे महत्त्वपूर्ण दस्तऐवज ठरणार असून इतिहासप्रेमी, साहित्यप्रेमी आणि संशोधकांसाठी ते एक मौल्यवान संदर्भग्रंथ ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

या पुस्तक प्रकाशन सोहळ्यास साहित्य, पत्रकारिता, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन निमंत्रक रुपाली आरोटे, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश आरोटे, इंजि.अक्षय आरोटे, डॉ. श्रावणी आरोटे, नमामी आणि य:मी यांनी केले आहे.

## ठाणे पालिकेच्या शाळांमध्ये विविध उपक्रम

ठाणे : (स. गांवकरी)

केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दिनांक 9 ते 15 ऑगस्ट 2026 या कालावधीत देशभरात 'हर घर तिरंगा' अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिका शाळांमध्ये विविध देशभक्तीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांसाठी 'तिरंगा राखी बनविणे' या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. ठाणे महानगरपालिका शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आकर्षक तिरंगा राख्या तयार केल्या. राखी निर्मितीच्या प्रत्यक्ष कृती कार्यक्रमात सर्व ठामपा शाळांतील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना तिरंग्याचे महत्त्व समजावून सांगत



राखी तयार करण्याच्या विविध टप्प्यांमध्ये मार्गदर्शन केले. केशरी, पांढरा आणि हिरवा या तिरंग्याच्या रंगांचा कल्पक वापर करून विद्यार्थ्यांनी सुंदर आणि आकर्षक राख्या तयार केल्या. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळण्याबरोबरच त्यांच्यामध्ये देशभक्तीची भावना दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला. ठाणे महानगरपालिका शाळा क्र. 18 शाळा क्र. 25 व 54 येथे आज (१० ऑगस्ट) रोजी 'हर घर तिरंगा' उपक्रमांतर्गत राखी तयार करणे हा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमात इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

# युवकांनी प्राचीन ज्ञानापासून प्रेरणा घेऊन नव भारत घडवावा : राज्यपाल जिष्णू देव वर्मा

## राज्यपालांच्या उपस्थितीत चतुर्वेद राष्ट्रीय वेदशास्त्र पुरस्कार प्रदान सोहळा संपन्न




नाशिक : (स. गांवकरी)

युवकांनी आधुनिक विज्ञानाचे शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता, नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्यासोबत प्राचीन ज्ञानापासून प्रेरणा घेत नव भारत घडवावा, असे आवाहन राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी केले. महर्षि गौतम गोदावरी वेद विद्या प्रतिष्ठान नाशिक आयोजित चतुर्वेद संमेलन तथा राष्ट्रीय वेदशास्त्र पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी महापौर हिमगौरी आडके-आहेर, राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे, वेदाचार्य रवींद्र पैठणे, प्रतिष्ठानचे संस्थापक, ब्रह्मर्षी पंडित शिवकुमार शर्मा, हरिद्वार येथील उत्तराखंड संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रमाकांत पांडे, केंद्रीय संस्कृत विद्यापीठ, नाशिक परिसराचे संचालक डॉ. नीलाभ तिवारी, धर्मभूषण गौरीशंकर राष्ट्रीय वेदशास्त्र पुरस्कार स्वागत समितीचे अध्यक्ष प्रा. जयंत भातांबरेकर, गोखले एज्युकेशन सोसायटीच्या सचिव दीप्ती देशपांडे आदी उपस्थित होते.

राज्यपाल श्री. वर्मा म्हणाले, युवकांनी आपली संस्कृती समजून घेण्यासोबतच जागतिक दर्जाचे शिक्षण घ्यावे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० या दिशेने एक महत्त्वाची संधी उपलब्ध करून देते. आधुनिक विज्ञान आणि प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरा यांचा समन्वय भारताला अधिक सामर्थ्यवान बनवू शकतो. महर्षी गौतम गोदावरी वेद विद्या प्रतिष्ठान समर्पण भावाने वेदपरंपरेच्या संरक्षण व संवर्धनाचे कार्य करीत आहे. हे कार्य अत्यंत प्रशंसनीय आहे. ही संस्था युवकांना आपल्या मुळांशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात हे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रतिष्ठानने राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांसोबत काम करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

राज्यपाल पुढे म्हणाले, नाशिक हे केवळ एक तीर्थक्षेत्र नाही, तर भारताच्या आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि ज्ञानपरंपरेचे एक महत्त्वपूर्ण केंद्र राहिले आहे. केंद्रीय संस्कृत विद्यापीठाचा परिसर येथे स्थापित होणे ही राज्यासाठी अभिमानाची बाब आहे. राज्यातील विद्यार्थी, संशोधक, संस्कृतचे अभ्यासक तसेच भारतीय ज्ञानपरंपरेच्या साधकांनी या केंद्राचा लाभ घ्यावा. आगामी काळात नाशिक हे वैदिक आणि संस्कृत अध्ययनाचे एक प्रमुख राष्ट्रीय केंद्र म्हणून विकसित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. वेद ही केवळ आपली परंपरा नाही, तर ते आपल्या भविष्यातील सामर्थ्यही ठरू शकतात. त्यासाठी आपल्याला वेदांचे संरक्षण, त्यांच्यावर संशोधन आणि अधुनिकतेसंदर्भात अभ्यास आणि वेदांचे ज्ञान व मूल्ये नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे, असेही श्री.वर्मा म्हणाले. वेद आणि भारतीय ज्ञानपरंपरेची ओळख आपल्या शाळा आणि महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना करून दिली पाहिजे. आधुनिकता आत्मसात करणारे युवक घडवितानाच ते आपल्या संस्कृतीशी जोडलेले असतील हेदेखील पहावयाचे आहे. वेद, उपनिषदे, भगवद्गीता, रामायण, महाभारत, संत साहित्य आणि भारतीय दर्शनातील मूलभूत विचार विद्यार्थ्यांपर्यंत सुलभ आणि आधुनिक माध्यमातून पोहोचविले पाहिजेत, असे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय वेदशास्त्र पुरस्काराने सन्मानित व्यक्तींना प्रदान करण्यात आलेले पुरस्कार केवळ विद्वत्तेचा सन्मान नाही तर, मानवतेला सत्य, धर्म, कर्तव्य आणि विश्वकल्याणाचा मार्ग दाखविणाऱ्या भारताच्या महान ज्ञानपरंपरेचा हा सन्मान आहे. वेद हे केवळ प्राचीन ग्रंथ नाहीत, तर ते भारताच्या ज्ञानचेतनेचे मूलस्रोत आहेत. आचार्य आणि विद्वानांनी मौखिक परंपरेच्या माध्यमातून वेदांचे जतन केले आहे. वेदांमध्ये निसर्ग आहे, विज्ञान आहे, तत्त्वज्ञान आहे, अध्यात्म आहे, जीवनाकडे पाहण्याची दृष्टी आहे आणि संपूर्ण मानवतेच्या कल्याणाची मंगलकामना आहे, असेही राज्यपालांनी सांगितले.

निलभ तिवारी यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. केंद्रीय संस्कृत विश्वविद्यालयाचे नाशिक येथे केंद्र सुरु होत असून यासाठी राज्य शासनाने जमीनही उपलब्ध करुन दिली आहे. या केंद्रामुळे नाशिकमधून वेदाच्या अभ्यासाची नवी पिढी निर्माण होण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले. कुलगुरू पांण्डेय यांनी आपल्या मनोगतात नाशिक ही धार्मिक, ऐतिहासिक, पौराणिक नगरी असून नाशिकचे महात्म्य लक्षात घेऊन याठिकाणी संस्कृत विद्यापीठाचे केंद्र सुरु होत असल्याचे सांगितले. संस्कृत विद्यापीठामुळे ज्ञान आणि विज्ञानाची सांगड घालून वेदशास्त्राचा प्रचार व प्रसारासाठी नवी पिढी पुढे येण्यास मदत होणार असल्याचे ते म्हणाले.